## प्रेस नोट ता.२९/०५/२०१९

## कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर

## “अवघ्या दोन तासांचे आत कोंढवा पोलीसांनी तक्रारदार महिलेला तिची गहाळ झालेली बॅग व त्यामधील किंमती ऐवज परत दिला मिळवून”

आज दि.२९/०५/२०१९ रोजी महिला तक्रारदार नामे अलका संभाजी जरांडे, वय-३२ वर्षे, धंदा-गृहीणी रा. सोनारपाडा गावीदेवी सोसायटी रुम नं.९, कल्याण शिव रोड, सोनारपाडा ठाणे या त्यांचे माहेरी गांव भिवरी,ता. पुरंधर जि. पुणे येथे जाण्याकरीता त्यांचा मुलगा नामे मयुर जंराडे याचेसह पुणे रेल्वे स्टेशन येथून रिक्षाने निघून शितल पेट्रोलपंप कोंढवा येथे सायंकाळी ०५.०० वा. चे सुमारास उतरल्या होत्या. त्यांनंतर थोडया वेळाने त्यांचे लक्षात आले की, त्यांची बॅग रिक्षामध्ये विसरली असुन, त्यांचे बॅगेमध्ये रु.२००००/- रोख रक्कम, १ तोळे सोन्याची चैन,१ सोन्याची अंगठी, सोन्याची नथ असा ऐवज होता. तक्रारदार यांना बॅग मिळून येत नसल्याने त्या तक्रार देणेकामी कोंढवा पोलीस ठाणे येथे आल्या होत्या.

नमुद तक्रारदार यांची तक्रार ऐकुन घेतल्यानंतर श्री. अनिल पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. संतोष शिंदे व पोलीस नाईक/६४५२ पृथ्वीराज पाडुंळे यांनी तक्रारदार महिला रिक्षातून ज्या ठिकाणी कोंढवा येथे उतरल्या त्या भागातील सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता, तक्रारदार महिला रिक्षा क्रमांक एमएच १२ सी.एच. ०२१३ या रिक्षाने कोंढवा येथे आल्याचे व सदर रिक्षामध्ये त्यांची बॅग विसरल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यांनतर सदर रिक्षाचे मालकांचा शोध घेवून रिक्षा चालक नदीम युसुफ अन्सारी रा. येवलेवाडी,पुणे याचे पर्यंत पोहचून रिक्षा चालकाकडील तक्रारदार यांची रिक्षामध्ये विसरलेली बॅग व त्यामधील रु.२००००/- रोख रक्कम,१ तोळे वजनाची सोन्याची चैन, १ सोन्याची अंगठी, १ सोन्याची नथ असा मुद्देमाल तक्रारदार महिला यांना अवघे दोन तांसामध्ये सुस्थितीत परत मिळवून दिला आहे.

तक्रारदार महिलेची बॅग ज्या रिक्षामध्ये विसरली होती त्या रिक्षाचा शोध घेणे पोलीसांना सीसीटीव्ही कॅमे-याचे सहाय्याने तात्काळ शक्य झाले. तरी पुणे पोलीसां तर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, आपण आपले सोसायटी, दुकाने, कार्यालये व इतर व्यावसायीक ठिकाणे या ठिकाणी सार्वजनिक रस्ते व चौक दृष्टीक्षेपात येतील अशा पध्दतीने सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे गुन्हे अथवा घटना उघडकिस आणण्यात पोलीसांना मदत होईल.

सदरची कामगिरी श्री. अनिल पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महादेव कुंभार पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरी.संतोष शिंदे, व पोलीस नाईक पृथ्वीराज पांडुळे यांनी केलेली आहे.

(अनिल पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर


महाराष्ट्र पोलीस
AJEET
ACADEMY